सकाळ

# शिवाजी विद्यापीठातील ११ विद्यार्थी टीसीएसमध्ये

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील ११ विद्यार्थ्यांची टी.सी.एस मल्टिनॅशनल कंपनीत निवड झाली. त्यांना प्रतिवर्ष ३.४ लाख रुपयांचे पॅकेज दिल्याचे शिवाजी विद्यापीठाने पत्रकात म्हटले आहे.

बी.टेक. अंतिम वर्षात (२०२१-२२) शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी टीसीएस कंपनीमार्फत निवड चाचणी घेतली. त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन शाखेतून सुशांत जाधव, ऋषिकेश घडक, वीरेन शहा, रोहित पाटील आणि जान्हवी नांदवडेकर यांची, कॉम्प्युटर सायन्स व टेक्नॉलॉजी शाखेतून कोमल पुरोहित, तेजल आंबोळकर, श्रेयस पाटील व ओंकार चौगुले यांची तर केमिकल टेक्नॉलॉजी शाखेतील अंकेष चौगुले आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेतून आशुतोष शिरोळे यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांची असिस्टंट सिस्टीम इंजिनिअर पदावर निवड झाली असून प्रतिवर्ष ३.४ लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे.

डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. बी. सादळे, तसेच डॉ. पी.डी. पाटील, डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. रश्मी देशमुख आणि डॉ. श्यामकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. अमर डुम, चेतन आवटी, प्रशांत पाटील व एस.बी. काळे यांनी प्रयत्न केले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

31 OCT 2021
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॅम्पस ड्राइव्हअंतर्गत बारा विद्यार्थ्यांची निवड

## शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मुलाखतीतून प्रत्येकी ३ लाखाचे पॅकेज

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाद्वारे आयोजित कॅम्पस ड्राइव्हमध्ये संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन या अभियांत्रिकी शाखांच्या अंतिम वर्षातील बारा विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. त्यांना प्रत्येकी वार्षिक ३ लाख रुपयांचे पॅकेज मिळणार आहे.

अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात नुकतेच कॉम्प्युटर व इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आले होते. आयटी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट क्षेत्रातील नामवंत एक्स्ट्राप्रिन्युअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि थिंकक्लाऊड सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्या कॅम्पस ड्राईव्हसाठी आल्या होत्या. कंपनीचे संचालक अविनाश भोकरे व सहकारी यांनी विद्यार्थ्यांना कंपनीविषयी माहिती दिली. मुलाखतीची प्रक्रिया व पॅकेज इत्यादींबाबत मार्गदर्शन केले. ड्राईव्हमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग आणि डॉ. डी. वाय. पाटील इंजीनिअरींग व टेक्नॉलॉजी महाविद्यालयातून १११ विद्यार्थी सहभागी झाले होते. ॲप्टीट्यूड टेस्ट व वैयक्तिक मुलाखतींमधून १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्यांना प्रतिवर्ष ३ लाख रुपयांचे पॅकेज देण्यात आले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये रश्मी वादगवे, सृष्टी करोषी, अंकिता आमटे, शिविका ओझा, बाळकृष्ण लिमये, विजय पाटील, श्रेयस देसाई, अर्पिता घोरपडे, अबोली जाधव, यश कोशामकर, राकेश सुतार, असीम शेख यांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी मार्गदर्शन करीत शुभेच्छा दिल्या.

Times of India

# SUK keeps exam fees unchanged

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University Kolhapur has decided not to increase the exam fees for all of its courses in the colleges in three districts including Kolhapur, Sangli and Satara.

Over 2.5 lakh students will benefit from the decision. The university hikes the exam fees by around 5% every year. The university authorities said the students are reeling under financial strain and the university does not want to put more financial burden on them.

Gajanan Palase, the chief controller of exams, SUK, said, "During the last two semester exams which were held online, we kept the exam fees unchanged. The fees range from Rs 300 to Rs 1,500 depending on the courses the students are enrolled in. We are soon going to roll out the schedule for the upcoming exam session. We hope keeping the exam fees unchanged will provide relief to the students to some extent."

The university charges the exam fees for the expenses it makes to hold exams, like for stationery, to pay for the online and offline services availed by the university to conduct the exam and declare the results.

पर्यावरण

# विदेशी तणांची घुसखोरी!

डॉ. व्ही. एन. शिंदे

चाळीसेक वर्षांपूर्वी महाराष्ट्रात पांढरी, बारीक, चांदणीच्या आकाराची फुले असणारे गवत सर्वत्र डोकेदुखी बनले होते. मुळात विदेशी असणाऱ्या या गवताला 'गाजर गवत' हे नाव आपण दिले. या गवताचे बीज १९७२ च्या दुष्काळात आयात केलेल्या धान्याबरोबर आले, असे मानतात. सुरुवातीला या गवताला गायीसारखी जनावरे तोंडही लावत नसत. अनेक वर्षांनी जनावरे खाऊ लागली. मात्र, हे गवत खाणाऱ्या जनावरांचे दूध कडू होत असे. शेतकऱ्यांची डोकेदुखी बनलेले हे गवत, नष्ट करण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागले. शेतात ज्या भागात ते वाढायचे, त्या भागातील उत्पन्न घटायचे. आज हे गवत पूर्णत: नामशेष झाले नसले, तरी बरेच कमी झाले आहे. त्याचवेळी अनेक विदेशी वाणांच्या वनस्पतींची वाढही होते आहे.



विदेशी वनस्पतींचा होणारा विस्तार भीतीदायक आहे. प्रामुख्याने टिथोनिया किंवा मेक्सिकन सनफ्लॉवर, कॉस्मॉस, रानमोडी किंवा जंगलमोडी आणि घाणेरी या चार वनस्पतींचा विस्तार इतक्या झपाट्याने होतो की, त्या भागातील जैवविविधताच धोक्यात येते. या वनस्पतींचा प्रसार वेगाने होतोच; पण या सहजीवी न राहता इतर वनस्पतींचे अस्तित्व संपवतात. काही वर्षांनी केवळ त्यांचेच अस्तित्व राहते. या वनस्पती पूर्वी ज्या भागात दिसत नसायच्या, अशा ठिकाणी दिसू लागल्या आहेत. वेगाने विस्तारणाऱ्या या वनस्पतींचे मूळ विदेशात आहे. विशेषत:, मेक्सिको देशातील या वनस्पती आहेत. त्या आता भारतात, विशेषत: महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकात मोठ्या प्रमाणात पसरत आहेत. सह्याद्रीच्या रांगांमध्येही त्यांचा प्रसार झाला आहे. सुरुवातीला एखाद-दुसऱ्या आकर्षक दिसणाऱ्या वनस्पतीचा पुढे असा काही विस्तार होतो की, त्या भागातील गवत, वनस्पती दिसेनाशा होतात. स्थानिक गवत, वनस्पती लुप्त पावताच त्यांच्यावर अवलंबून असणारे जीव स्थलांतरित होतात. त्याचा त्या-त्या भागातील पर्यावरणावर मोठा अनिष्ट परिणाम होतो.

पूर्वी केरळपासून कर्नाटकपर्यंतच्या जंगलांमध्ये राहणारे हत्ती आता महाराष्ट्रात कोल्हापूरपर्यंत आले आहेत. ते या भागातील शेतीचे तर नुकसान करतातच; पण आता नागरी वस्तीतही शिरू लागले आहेत. निसर्गातील विविध घटकांचे नागरी वस्त्यांमध्ये शिरण्यामागे जंगलांचे घटणारे प्रमाण कारणीभूत आहेच; पण आहे त्या जंगलांमध्येही त्यांना चारा आणि पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे ते नागरी वस्तीत येतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. पशू-पक्षी आपले स्थान बदलू शकतात. अन्न आणि पाणी मिळेल त्या भागात ते स्थलांतरित होतात, फिरत राहतात. मात्र, वनस्पतींना स्थलांतर करता येत नाही. विदेशी वाणांचे अतिक्रमण झाले आणि जगण्यायोग्य वातावरणच राहिले नाही, तर स्थानिक वनस्पती अशा आक्रमणात संपतात.

**विदेशी वनस्पतींचा होणारा विस्तार भीतीदायक आहे. प्रामुख्याने टिथोनिया किंवा मेक्सिकन सनफ्लॉवर, कॉस्मॉस, रानमोडी किंवा जंगलमोडी आणि घाणेरी या चार वनस्पतींचा विस्तार इतक्या झपाट्याने होतो की, त्या भागातील जैवविविधताच धोक्यात येते. या वनस्पतींचा प्रसार वेगाने होतोच; पण या सहजीवी न राहता इतर वनस्पतींचे अस्तित्व संपवतात.**

आक्रमणकर्त्या वनस्पतींना येथील पशू, पक्षी, कीटक सरावलेले नसतात. त्यास अनेक वर्षांचा काळ जातो. टिथोनियाच्या बिया, तीस वर्षांच्या सहवासानंतर पोपट खाताना दिसू लागले आहेत. खारुताईही त्याच्या हिरव्या बिया खाताना आढळून आल्या. मात्र, ही सवय व्हायला काही दशकांपासून शतकांपर्यंतचा काळ जातो. गुलमोहोर शेकडो वर्षांपासून भारतात फुलत असूनही त्यावर



मधमाश्यांचे पोळे आढळत नाही. पोपट वगळता, अन्य पक्षीही गुलमोहोराकडे फिरकत नाहीत. मात्र, यांची स्थानिक वाणांच्या तुलनेत कितीतरी जास्त प्रमाणात रोपे तयार होतात आणि पसरतातही. याचे लाकूड, पाने, शेंगा आणि इतर घटकांचे उपयोग आपणास ज्ञात नाहीत. मात्र, केवळ ते उन्हाळ्यात आकर्षक फुलतात म्हणून आपण लावतो. याचे उपयोग माहीत होईपर्यंत येथील मूळ वनस्पती नामशेष होण्याची शक्यता असते.

पुणे-कोल्हापूर प्रवास करताना पुण्याच्या बाहेर पडताच अगदी साताऱ्यापर्यंत, रस्त्याच्या दोन्ही बाजूला कॉस्मॉसच्या पिवळ्या, भगव्या किंवा केशरी आणि क्वचित गुलाबी फुलांचे ताटवे खुलून दिसायचे. पाहत राहावीत अशी फुले. यावेळीही प्रवास करताना मी ही फुले शोधत होतो. काही दिवसांपूर्वी त्या फुलांचे ताटवे शेताच्या बांधावर आणि दूर टेकड्यांपर्यंत फुललेले दिसले. नेहमी मन प्रसन्न करणारी ही फुले आता विषण्ण करतात. पूर्वी निव्वळ रस्त्याकडेला दिसणारी फुले आज खूप दूरवर पसरली आहेत. या वनस्पतीचे मूळ मेक्सिकोत आहे. चार ते बारा फुटांपर्यंत कॉस्मॉस वाढते. यावर कोणतीही



फुलपाखरे, मधमाश्या, भुंगे दिसत नाहीत. कदाचित याचे स्वयंफलन होत असावे. एका रोपापासून दरवर्षी हजारो रोपांची भर पडते. अगदी गवतालासुद्धा नामशेष करत ही वनस्पती पसरत जाते. मखमल किंवा झेंडूसारखी पाने असल्याने याला 'गावठी झेंडू' असे नाव मिळाले. मात्र, हे खूप घातक तण आहे.

कॉस्मॉसइतकेच किंवा त्याहून भयानक वेगाने वाढणारी विदेशी वनस्पती म्हणजे टिथोनिया किंवा मेक्सिकन सनफ्लॉवर. याची पाने खूप मोठी आणि पसरट असतात. सर्व सूर्यप्रकाश अडवल्यामुळे खाली गवत किंवा इतर वनस्पती वाढत नाहीत. याचा प्रादुर्भाव झालेल्या भागात काही वर्षांत केवळ याचीच रोपे दिसू लागतात. खूप विचित्र पद्धतीने आणि वेगाने वाढणाऱ्या या वनस्पतीला लाल आणि पिवळ्या रंगाची फुले येतात. फुले खूप आकर्षक असतात. त्यामुळे अनेकजण आवर्जून याची लागवड बागेत करतात. ही वनस्पतीही स्थानिक वनस्पतींना नष्ट करत आपले साम्राज्य पसरवते.

रानमोडी नावाचे तण आता शेतामध्ये, बांधावरच नव्हे, तर अगदी सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्येही मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. याचा प्रसारही वेगाने होतो. ही वनस्पती झाडाझुडपांच्या जवळ उगवली, तर अगदी वीस फूट उंची गाठते. जांभळ्या रंगाची छोटी फुले येतात. बियांना कुस असते आणि वाऱ्याबरोबर उडून दूर जात यांचा प्रसार झपाट्याने होत जातो. पानांचा आकार गुलबक्षीसारखा असतो. पाने गडद हिरवी असतात.

या तिन्ही वनस्पतींच्या फुलांना आणि पानांना कोणताही विशेष वास नाही. फुले आकर्षक असली, तरी त्यांच्यावर कीटकांचा वावर आढळून येत नाही. जनावरे या वनस्पतींना खात नाहीत. आपण या वनस्पतींचा प्रसार रोखला पाहिजे. घाणेरीदेखील असेच परदेशी तण आहे. घाणेरीला आपण अनेक वर्षे पाहत आहोत. बालपणी या फुलांच्या देठाजवळचा मध अनेकांनी चाखला असेल. मात्र, घाणेरीचे निरीक्षण केले, तर याचेही तोटे लक्षात येतील. घाणेरीचाही प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे. आजही होत आहे. त्यामुळे जंगलातील प्राण्यांना आवश्यक खाद्य उपलब्ध होत नाही. घाणेरीच्या पानांना आणि फुलांना वास असला आणि कीटक त्यावर येत असले, तरी जनावरे खात नाहीत.

घाणेरी आणि रानमोडी वर्षभर जगतात. कॉस्मॉस आणि टिथोनिया पावसाळ्यात उगवून उन्हाळ्यात वाळून जातात. त्यांना जनावरे खात नसल्याने त्या भागात आग लागली, तर नियंत्रणात आणणे कठीण होते. त्यामुळे त्या भागातील वृक्षसंपदेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही स्वयंसेवी संस्था आणि संशोधक या वनस्पतींच्या धोक्याकडे लक्ष वेधत आहेत. मात्र, अजूनही यांचा धोका ओळखून त्यांचा बीमोड करण्यासाठी विशेष प्रयत्न होताना दिसून येत नाहीत. यांच्या निर्मूलनासाठी व्यापक जनचळवळीची गरज आहे.

शिवाजी विद्यापीठ परिसरातील कॉस्मॉसचे प्रमाण कमी करण्यासाठी मागील चार वर्षांपासून मोहीम राबवली जात आहे. मात्र, अजूनही पूर्ण निर्मूलन झालेले नाही. या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर आपली अवस्था ग्रीक कथेतील हात लावेल त्या वस्तूचे सोने होणाऱ्या मिडास राजासारखी होईल. या वाणांची रोपवाटिकांतून होणारी विक्री तातडीने थांबवण्याची गरज आहे. या घातक तणांना केवळ आकर्षकतेपायी पसरू दिले, तर स्थानिक वनस्पती आणि गवत नष्ट होऊन जनावरांना पर्यायाने आपल्यालाही उपाशी राहण्याची वेळ येईल. म्हणून वेळीच सावध होऊन त्यांचा बीमोड करूया. संपन्न जैवविविधता वाचवूया!

# सिंहायन
## आत्मचरित्र

गतवर्षी पाच नोव्हेंबर २०२० रोजी 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी पंचाहत्तर वर्षे पूर्ण केली. 'पुढारी' हे विविध चळवळींचे प्रथमपासूनचे व्यासपीठ. साहजिकच, संयुक्त महाराष्ट्र लढ्यापासून अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटनांचे ते साक्षीदार आहेत. केवळ साक्षीदार नव्हे, तर सीमा प्रश्नासह अनेक आंदोलनांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. पाऊण शतकाचा हा प्रवास; त्यात कितीतरी आव्हाने, नाट्यमय घडामोडी, संघर्षाचे प्रसंग! हे सारे त्यांनी शब्दबद्ध केले आहे, ते या आत्मचरित्रात. या आत्मचरित्रातील काही निवडक प्रकरणे 'बहार'मध्ये क्रमशः प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

- संपादक, बहार पुरवणी

**डॉ. प्रतापसिंह ऊर्फ बाळासाहेब ग. जाधव**
**मुख्य संपादक, दैनिक पुढारी**

# ललितकलांची बहार

**प्रकरण ३६**

कोल्हापूर म्हणजे खऱ्या अर्थानं कलापूर. कोल्हापूरनं कधी केशराचे मळे फुलवले नाहीत; पण कलाकारांचे मळे मात्र आवर्जून फुलवले. इथं कलाकार पेरले जातात. त्यांना खतपाणी घातलं जातं. मग ते फोफावतं. त्याचा विशाल वृक्ष होतो आणि एकेका वृक्षाला असंख्य कलाकारांची गोड फळे लागतात! म्हणून हे कलापूर. संगीत, गायन, नाटक यासारख्या ललितकलांबरोबरच चित्रपट, चित्रकला, शिल्पकला अशा विविध कला प्रकारांत आपला खोलवर ठसा उमटवीत कोल्हापूरनं आपलं 'कलापूर' हे नाव सार्थ केलं आहे. करवीर संस्थानातील अनेक नामवंत गायक-वादकांनी कोल्हापूरचा झेंडा देशभर फडकावला होता. भूगंधर्व रहिमत खाँ, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यासारख्या नामवंतांनी कोल्हापुरात धृपद, धमार, ख्याल, ठुमरी यासारख्या अभिजात गायकीचं बीजारोपण केलं. गेल्या सुमारे दोनशे वर्षांपासून कोल्हापुरात संगीत आणि नाट्यकला उत्तरोत्तर बहरतच गेली.

राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांनी १८९४ मध्ये संस्थानाची सूत्रं हाती घेतली आणि त्या क्षणापासूनच संगीतकलेचा सुवर्णकाळच सुरू झाला. त्यांनी अनेक कलाकारांना राजाश्रय दिला. त्यातील सर्वात महत्त्वाचं नाव म्हणजे गानमहर्षी अल्लादिया खाँ! पुढे मग भास्करबुवा बखले, मंजी खाँ, भूर्जी खाँ ही सारी त्यांचीच शिष्य प्रभावळ. मंजी खाँ आणि भूर्जी खाँ हे अल्लादिया खाँ यांचे सुपुत्रच. मग पुढे, मल्लिकार्जुन मन्सूर, वामनराव सडोलीकर, धोंडुबाई कुलकर्णी ही भूर्जी खाँ यांची शिष्यमंडळी. प्रसिद्ध गायक निवृत्तीबुवा सरनाईक हेही याच घराण्याचे, तर महाराष्ट्र कोकीळ शंकरराव सरनाईक हे अल्लादिया खाँ यांचे गंडाबंद शिष्य. कोल्हापूरचं नाव ज्यांनी ज्यांनी उज्ज्वल केलं, त्यात केशवराव भोसले, गोविंदराव टेंबे, माझे चुलत आजोबा भाऊराव जाधव सर्वात अग्रभागी होते.

जणू स्वर्गातील सारे गंधर्व नि गंधर्विणी तसेच अप्सरा, किन्नर आणि यक्ष-यक्षिणी एकाच काळात भूतलावर; किंबहुना खास करवीरनगरीतच अवतरले की काय, असा प्रश्न पडावा, असाच चमत्कार घडला होता!

संगीत रंगभूमीवर सुवर्णकाळ निर्माण करणारे बालगंधर्व आणि दिग्गज नटश्रेष्ठ संगीतसूर्य केशवराव भोसले हेही कोल्हापूरचेच सुपुत्र. १९१५ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात अत्यंत तंत्रशुद्ध आणि भव्य असे नाट्यगृह बांधून, त्याचं नामकरण 'पॅलेस' थिएटर केलं. एवढं चांगलं नाट्यगृह त्या काळात देशात अन्यत्र कुठेही नव्हतं. जे करायचं ते झोकात, असाच राजर्षींचा खाक्या होता. संगीतसूर्य केशवराव भोसले हे कोल्हापूरचेच सुपुत्र असल्यामुळे, त्यांचं रंगभूमीवरचं योगदान लक्षात घेऊन त्यांचं नाव पॅलेस थिएटरला देणं संयुक्तिक होईल, असं आबांना वाटलं. त्यासाठी त्यांनी सातत्यानं प्रयत्न केला आणि १९५८ मध्ये या नाट्यगृहाचं नामकरण 'संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह' असं करण्यात येऊन, या थोर गायक-अभिनेत्याची स्मृती चिरंतन ठेवण्यात आली.

केशवराव भोसलेंच्या बरोबरच महाराष्ट्र फिल्म कंपनीचे संस्थापक बाबुराव पेंटर, त्यांचे शिष्य व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, बाबुराव पेंढारकर, मा. विनायक पार्श्वनाथ आळतेकर, राजा पंडित, सुधीर फडके, ग. दि. माडगूळकर, दिनकर द. पाटील, अनंत माने, चंद्रकांत, सूर्यकांत, अरुण सरनाईक, राजा गोसावी, रमेश देव, सुलोचना, कान्होपात्रा, शांता तांबे अशा अनेक नामवंत कलाकारांनी कोल्हापूरचा नावलौकिक उंचावला. भालजी पेंढारकरांच्या 'महारथी कर्ण' चित्रपटात पृथ्वीराज कपूर चमकले होते. त्यांच्या 'वाल्मीकी' या चित्रपटाद्वारे राज कपूर यांचा सिनेमासृष्टीत प्रवेश झाला. आबालाल रेहमान, बाबुराव पेंटर, माधवराव बागल, रावबहादूर धुरंधर, दत्तोबा दळवी, जी. कांबळे, गणपतराव वडणगेकर, पी. सरदार, रवींद्र मेस्त्री या चित्रकारांनी कोल्हापूरचा नावलौकिक वाढवला.

पुष्पशय्येवर लोळूनही ज्याच्या अंगाला फुलांचा सुगंध लागला नाही, त्याला कपाळकरंटाच म्हणावं लागेल. त्यामुळेच की काय; कोण जाणे किंबहुना त्याचमुळे कलेची रंगपंचमी खेळणाऱ्या या गावात, माझ्या आजोबांच्या अंगालाही तो रंग लागला नाही तरच नवल! माझे आजोबा म्हणजे बाबा हेही त्या काळात एक प्रसिद्ध शाहीर होते. ते खड्या आवाजात वीररसाचे पोवाडे सादर करीत. त्यांची लोकप्रियता एवढी होती की, त्यांच्या कार्यक्रमांना गर्दी होत असे. तसेच माझे चुलत आजोबा भाऊराव जाधव हे नामांकित अभिनेते होते. इंदूरच्या राजदरबारानंही त्यांचं कौतुक केलं होतं. रंगभूमीवर काम करीत असतानाच या अभिजात अभिनेत्यानं कायमची 'एक्झिट' घेतली! त्यांना रंगमंचावरच मृत्यू आला!

मग आजोबा आणि चुलत आजोबा यांची कला परंपरा माझ्यात भिनणार नाही, असं कसं होईल? हा अनुवांशिकतेचा भाग म्हणा किंवा रक्तातला गुण म्हणा, मलाही गायन-वादनाची मनापासून आवड होती आणि आजही ती सुप्तपणे माझ्या अंतरंगात जीवित आहे. मला जितकं गाण्याचं वेड होतं, त्याहूनही हार्मोनियम वादनाचं वेड अधिक होतं. का कुणास ठाऊक; पण हार्मोनियमचे सूर मला वेड लावायचे. त्या ऊर्मीतूनच मी तेव्हा संगीतकार बाळ जमेनीस यांच्याकडे काही काळ हार्मोनियम वादनाचे धडेही गिरवले होते.

परंतु, पुढे शिक्षणासाठी पुण्याला झालेलं स्थलांतर आणि अभ्यासाचा वाढता ताण आणि नंतरच्या काळात 'पुढारी'चा प्रचंड व्याप; यामध्ये हार्मोनियमचे सूर कुठेतरी हरवल्यासारखेच झाले! तरीही मला काही माझ्या संगीतसाधनेचा छंद पुरा करता आला नाही. त्याची खंत मनात असली, तरी त्याला माझाही नाइलाजच होता. कारण, 'पत्रकारिता' ही माझी प्रायोरिटी होती. 'पुढारी'ला माझ्याशिवाय दुसरा कुणी वाली नव्हता. त्यामुळे पत्रकारिता ही माझी जन्मजात जबाबदारीच होती. एखाद्या एकुलत्या राजपुत्राला, 'मी राजा होणार नाही, मी दुसरंच काही तरी होणार,' असं म्हणता येत नाही. त्याला राजाच व्हावं लागतं. तसेच मलाही 'संपादक' होण्याचं क्रमप्राप्त होतं.

काही लोक आपापले व्यवसाय सांभाळून अन्य छंदही जोपासतात; पण मला ते कधीच जमलं नाही. कारण, मी 'डिव्होशनला' महत्त्व देणारा माणूस आहे आणि माणसाला एकाचवेळी अनेक गोष्टींमध्ये डिव्होशन देता येत नाही. "Jack of all trades, master of none" अशी एक इंग्रजी उक्ती आहे. 'मला सगळंच येतं; पण प्रभुत्व कशातच नाही,' असा त्याचा अर्थ होतो. परंतु, मला 'जॅक ऑफ ऑल ट्रेडस्' कधीच व्हायचं नव्हतं. मी जे करेन त्यात मला 'मास्टरी'च मिळवायची होती आणि मग एकदा पत्रकार होण्याचं निश्चित झाल्यावर मी माझं सारं 'डिव्होशन' 'पुढारी'मध्येच ओतलं!

तरीही एक रसिक म्हणून का असेना, ललितकलांच्या सर्व प्रकारांवर माझं लक्ष आणि रूची कायमच राहिली. माझं मन सदैव गुणगुणत राहिलं आणि ललितकलांभोवती गुंजारव करीत राहिलं..!

त्यामुळेच अशा समृद्ध आणि वैभवशाली कला परंपरा असणाऱ्या कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात ललितकला आणि नाट्यशास्त्राचा स्वतंत्र विभाग नसावा, याची माझ्या मनाला खूप खंत लागून राहिली होती. विद्यापीठात असा अभ्यासक्रम नसणे ही 'कलापूर' म्हटल्या जाणाऱ्या कोल्हापूरसाठी अभिमानाची गोष्ट नक्कीच नव्हती.

शिवाजी विद्यापीठात ललितकला विभाग नसला, तरी कोल्हापूरची नाट्य आणि संगीत परंपरा जपणारी काही सन्माननीय मंडळी कोल्हापुरात होतीच. उद्योगपती रसिकभाई शहा हे तर नावाप्रमाणेच रसिक. पिराजीराव सरनाईक, बालशाहीर तथा बाबा सरनाईक हे माझे निकटचे मित्र. बाबांनी तर बालपणापासूनच शाहिरी गाजवली. या दोघांबरोबरच अनेक नामवंत गायक-गायिकांच्या मैफिलीचा मी आस्वाद घेतला. कोल्हापूर शुगर मिल्सतर्फे मदनमोहन लोहिया हे दरवर्षी संगीत नाटकाचा प्रयोग करीत. या संगीत नाटकांचं दिग्दर्शन अनेकवेळा चिंतामणराव कोल्हटकर करीत. हे प्रयोग मी आवर्जून पाहिलेले आहेत.

संगीत आणि नाट्यकलेविषयी असलेल्या आवडीतूनच मी विद्यापीठाच्या ललितकला विभागाचा ध्यास घेतला होता आणि मग लवकरच माझ्या या मागणीला सबळ पाठिंबा मिळणारी एक घटना अगदी अचानकच घडली.

कोकिळेचे मधुर गुंजन जेव्हा आपल्या कानी पडतं, तेव्हाच आपल्याला 'वसंत ऋतू'ची चाहूल लागते. विद्यापीठाच्या ललितकला विभागाच्या बाबतीतही जणू असंच घडलं, असं म्हणावं लागेल. त्याचं काय झालं की, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना २१ नोव्हेंबर, १९७८ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या वतीनं सन्माननीय डॉक्टरेट प्रदान करण्यात आली.

भारताचे इंग्लंडमधील माजी राजदूत बॅ. आप्पासाहेब पंत यांच्या हस्ते लतादीदींना डॉक्टरेट बहाल करण्यात आली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी तत्कालीन कुलगुरू बी. एस. भणगे होते. आपल्या भाषणात लतादीदींनी शिवाजी विद्यापीठात ललितकला विभाग नसल्याची खंत बोलून दाखवली. माझ्या मनात जी खंत होती, तीच दीदींनी प्रकट केली आणि ते साहजिकच होतं. विद्येच्या दरबारातील ताला-सुरांची अनुपस्थिती गानकोकिळेला नाही, तर आणखी कुणाला कळणार होती?

**'यह कैसा सूर मंदिर है जिस में संगीत नहीं।**
**गीत लिखे दीवारों पे गाने की रीत नहीं।'**

दीदींना कदाचित त्यांच्याच या गीताची आठवण त्या क्षणी प्रकर्षानं आली असेल. मात्र, लतादीदींच्या त्या वक्तव्यानं शिवाजी विद्यापीठातील 'ललितकला विभाग'च्या स्थापनेची चाहूल लागली, हे मात्र निश्चित.

खरं म्हणजे शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच आबांच्या मनात, विद्यापीठात ललितकला विभाग असावा, अशी कल्पना घोळत होती. त्यांनी याबाबत संगीतकार सी. बालाजी यांच्याशी चर्चाही केली होती. इतकेच नव्हे, तर विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यासमोरही त्यांनी हा प्रस्ताव ठेवला होता. मग विद्यापीठानंही तो प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. तथापि, त्यावर शासनाचं आलेलं उत्तर निराशाजनकच म्हणावे लागेल. 'ललितकला शाखेला मान्यता देऊ. मात्र, अनुदान देता येणार नाही,' या शब्दांत शासनानं बोळवण केली होती. आर्थिक प्रश्न देणगी रूपानं सोडवावा, असा फुकटचा सल्लाही शासनाकडून मिळाला होता.

त्यामुळे हा प्रश्न तसाच बासनात गुंडाळून पडला होता. परंतु, लतादीदींनी ती खंत बोलून दाखवल्यानंतर मात्र मी पुढाकार घ्यायचं ठरवलं आणि लगेचच कामाला लागलो. मला कुठलंही घोंगडं भिजत ठेवणं अजिबात आवडत नाही. तेव्हा माझं वास्तव्य जास्तकरून मुंबईतच होतं; मी १९८१ साली कोल्हापूरला परत आलो. त्यानंतर मी २६ मार्च, १९८२ रोजी कोल्हापुरात सुजाण आणि रसिक नागरिकांची बैठक बोलावली. ही बैठक उद्यमनगरातील रामभाई सामाणी हॉलमध्ये पार पडली. तत्कालीन कुलगुरू रा. कृ. कणबरकर सभेच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत ललितकला शाखा उभारणीसाठी एक समिती निवडण्यात आली.

सर्वांना मीच घोड्यावर बसवलं होतं, म्हटल्यावर सर्वांनी मिळून त्याची 'बागडोर' माझ्याच हातात दिली. अर्थात, सर्वानुमते समितीचं अध्यक्षपद माझ्याकडेच सोपवण्यात आलं. उपाध्यक्षपदी नावाप्रमाणेच रसिक असलेले रसिकभाई शहा होते. त्यांच्या जोडीला डी. डी. शिंदे यांचीही निवड करण्यात आली, तर बाबुराव धारवाडे यांची कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड झाली. दिनकरभाई शहा हे खजिनदार होते. संगीतकार सी. बालाजी तसेच डॉ. गजानन जाधव, म. सु. कारेकर हे चिटणीस होते.

कार्यकारिणीत महापौर (पदसिद्ध), जि. प. अध्यक्ष (पदसिद्ध), खा. उदयसिंगराव गायकवाड, मदनमोहन लोहिया, किरण दे. शहा, शां. कृ. वालावलकर, चंद्रकांत मांडरे, गोविंदराव गुणे, भाऊसाहेब टेंबे, श्रीमती सुनीता खाडीलकर इत्यादी मान्यवरांचा समावेश होता.

अध्यक्षपदाची सूत्रं स्वीकारतानाच मी 'पुढारी'तून भरीव रक्कम देणगी स्वरूपात ललितकला विभागासाठी दिली. कोणताही सार्वजनिक उपक्रम असेल, तर माझी रक्कम देऊन पहिली पावती करतो आणि मगच निधी जमवण्यास सुरुवात करतो. त्याप्रमाणे ललितकला विभागासाठी चाळीस लाखांचा निधी जमविण्यासाठीचा श्रीगणेशा केला. अजिजुद्दीन खाँसाहेब यांच्यासह अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी एक अभ्यास मंडळ नियुक्त करण्यात आलं. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला मी निधी संकलनाला वेग आणला.

निधी संकलनातील अस्मादिकांचा अनुभव दांडगा! त्यामुळे हे नाठाळ घोडं नेहमी आमच्यासाठीच राखून ठेवलेलं. तेही बिना रिकीबीचं! परंतु, नित्याप्रमाणेच आम्ही त्याच्यावर मांड ठोकली आणि कामाला लागलो! महापालिका आणि लक्ष्मीबाई जाधव ट्रस्ट यांनी देणगी द्यायचं मान्य केलं होतं. त्याचा पाठपुरावा केला. तसेच रसिक, उद्योगपती आणि व्यावसायिकांकडे मी शब्द टाकला की, माझा शब्द खाली पडू द्यायचाच नाही, असं जणू त्यांनी ठरवलंच होतं. त्यामुळे पाहता पाहता ललितकला शाखा सुरू करण्याइतपत निधी जमा झाला.

मदत करणाऱ्यांची भावना प्रामाणिक असेल, तर एखादं कार्य सुलभपणे तडीस जातं, याचा अनुभव आम्हाला म. सु. कारेकरांच्या रूपानं आला. म. सु. कारेकर हे शिवाजी विद्यापीठातील एक कर्मचारी. ते मूळचे पत्रकार. परंतु, आयुष्यभर त्यांनी विद्यापीठात नोकरी केली आणि नेमके ते याच काळात निवृत्त झाले. दुर्दैवानं त्या काळापावेतो विद्यापीठ कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाची योजना लागू झालेली नव्हती. त्यामुळे त्यांची सारी मदार प्रॉव्हिडंट फंड आणि ग्रॅच्युईटीवरच अवलंबून असे. परंतु, विद्यापीठात ललितकला विभाग चालू होतोय म्हटल्यावर कारेकरांनी आपली सारी ग्रॅच्युईटीची रक्कम देणगी म्हणून देऊन टाकली! त्यांचं तर लग्नही झालेलं नव्हतं. त्यामुळे त्यांना म्हातारपणी सांभाळायला मुलंबाळंही नव्हती. तरीही त्यांनी हा त्याग केला. या त्यागाला तोड नव्हती. संस्था उभ्या राहतात, त्या अशा निःस्पृह माणसांच्या त्यागावरच!

त्यांच्या पाठोपाठ विद्यापीठ सेवक संघानंही या चांगल्या कामाला स्वयंस्फूर्तीनं हातभार लावला. या मदतीमुळे तत्कालीन अडचणी दूर व्हायला हातभार लागला. खरं म्हणजे कुलगुरूंनी प्रारंभी पाच लाखांपर्यंत निधी उभा करावा, असं सुचवलं होतं. तेवढा पुरेल, अशी अपेक्षा होती; पण ललितकला शाखेचा व्याप वाढला आणि हा आकडा चाळीस लाखांवर गेला. तेवढ्या निधीची मी उभारणी केली. काही कमी पडू दिलं नाही आणि मगच त्या नाठाळ घोड्यावरून पायउतार झालो.

आणि मग २० जुलै, १९८४ रोजी प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या शुभ हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या ललितकला विभागाच्या संगीत पदविका शाखेचं एका शानदार सोहळ्यात उद्घाटन झालं! पंडित मल्लिकार्जुन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यामागेही एक पार्श्वभूमी होती. एक चालता-बोलता इतिहास होता.

राजर्षी शाहू महाराजांनी उत्तर हिंदुस्थानातील गानमहर्षी अल्लादिया खाँसाहेब यांना कोल्हापुरात दरबारी गायक म्हणून आणलं होतं. अल्लादिया खाँसाहेबांनी कोल्हापूरच्या संगीत परंपरेला परीसस्पर्श केला. मात्र, त्यातून अनेक अभिजात गायकांचं सोनं झालं. त्यांचेच सुपुत्र भूर्जी खाँ यांचे पंडित मल्लिकार्जुन हे शिष्य होत. शिवाजी विद्यापीठातील संगीत पदविका विभागाचं उद्घाटन मल्लिकार्जुन यांच्या हस्ते व्हावं, हा नियतीनं जुळवून आणलेला योगायोगच म्हणायचा.

त्यांनी तानपुरा छेडताच सूर झंकारले. त्या सुरांनी अवकाश व्यापलं आणि दाही दिशा दवंडी पिटली की, शिवाजी विद्यापीठाच्या ललितकला विभागाच्या संगीत पदविका अभ्यासक्रमाचा शुभारंभ झालेला आहे!

यावेळी पं. मल्लिकार्जुन यांनी अतिशय मनोज्ञ उद्गार काढले. ते म्हणाले,

"राजर्षी शाहू महाराज यांनी अल्लादिया खाँ यांच्यासह अनेक पट्टीचे गवई कोल्हापुरात आणले. खरं तर, गायन शिक्षण क्षेत्राचं उद्घाटन या थोर राजानं या नगरीत केव्हाच केलेलं आहे! मी आता इथं कसलं उद्घाटन करणार? मी केवळ 'मम' म्हणण्यासाठी आलो आहे."

पंडित मल्लिकार्जुन यांचं हे भाष्य म्हणजे जणू त्यांनी राजर्षींना केलेला मानाचा मुजराच होता आणि त्याचवेळी कोल्हापूरकरांना करून दिलेली कर्तव्याची जाणीव होती, असं म्हटलं तर ते चुकीचं होणार नाही.

संगीत पदविका विभागाचं उद्घाटन हे एका अर्थानं ललितकला विभागाचंच उद्घाटन होतं; पण तरीही २ फेब्रुवारी, १९८७ रोजी खऱ्या अर्थानं ललितकला विभागाचं रीतसर उद्घाटन करण्यात आलं! यावेळी उद्घाटक होते, प्रख्यात साहित्यिक, नाटककार, संगीतकार असं महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे तथा भाई! भाईंनी आपल्या नर्मविनोदी, खुसखुशीत भाषणात कोल्हापूरच्या वैभवशाली कला परंपरेचा गौरव केला. संगीत हा देश जोडणारा एकमेव सांधा असल्याचं सांगून त्यांनी श्रोत्यांना अंतर्मुख केलं.

'मिले सूर मेरा तुम्हारा, तो सूर बने हमारा,' या गाण्याची त्यावेळी श्रोत्यांना आवर्जून आठवण आली. निधी संकलनासाठी आम्ही घेतलेल्या परिश्रमाचं भाईंनी मनापासून कौतुक केलं.

मी माझ्या भाषणात पु. ल. देशपांडे हे कोल्हापूरचेच सुपुत्र असल्याचं सांगून म्हणालो, "भाई हे मूळचे कोल्हापूरचेच! भाईंचे पूर्वज चंदगड तालुक्यातील 'कलानिधी'गडाचे किल्लेदार. भाईंनी कलेचा वारसा या गडाकडूनच घेतला असावा. भाई हे कोल्हापूरचेच असल्यानं, त्यांच्या हस्ते ललितकला विभागाचं उद्घाटन हा मणिकांचन योगच म्हटला पाहिजे!"

मी दिलेली माहिती अलीकडच्या पिढ्यांना ठाऊक असण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे भाईंचं मूळ कोल्हापुरातच असल्याचं ऐकून उपस्थित सर्वांनाच एक सुखद धक्काच बसला. माझ्या भाषणात मी काही हिंदी अवतरणंही उद्धृत केली आणि श्रोत्यांची दाद मिळवली. जसं की,

"दुनिया में चाहे कितनी भी भाषाएँ हो जाये, लेकिन संगीत से अच्छी कोई भी भाषा नहीं हो सकती है। जिसे सब समजते हैं।"

शिवाय, "आधुनिक युगात कला ही मानवी जीवनाचा एक अनुषंगिक भाग बनून गेलेली आहे. दैनंदिन जीवनात कलेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेलं आहे." असं सांगून मी म्हणालो, "इ.स.पूर्व ३८४ वर्षे आधी होऊन गेलेल्या ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल यानं ललितकलेची उपयुक्तता सांगताना म्हटलंय,

"The aim of the art is to represent not the outword appearance of things, but their inward significance."

'कलेचा उद्देश केवळ माणसांचं बाह्यात्कारी मनोरंजन करणं नाही, तर माणसाला अंतर्मुख करणं हा कलेचा महत्त्वाचा हेतू आहे.'



शिवाजी विद्यापीठाच्या ललितकला विभागाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या हस्ते २ फेब्रुवारी १९८७ रोजी झाले. त्यावेळी पु.ल. यांनी आमच्या 'इंदिरा निवास'ला सपत्नीक भेट दिली. छायाचित्रात डावीकडून कर्नल आनंदराव जाधव, सौ. गीतादेवी जाधव, सुनीता देशपांडे, पु.ल., आबा, मी व आप्पासाहेब जाधव.

ललितकला विभागाच्या उद्घाटनाच्या निमित्तानं एक वैचारिक मैफिलीच रंगली आणि या सर्वांगसुंदर समारंभाला माझ्या पत्नी सौ. गीतादेवीही आवर्जून उपस्थित होत्या, हे विशेष!

या ललितकला विभागात मग १९९१ मध्ये वाद्य संगीत विभागाची भर पडली. अल्लादिया खाँ यांचे नातू अजिजुद्दीन खाँ यांच्या हस्ते हा विभाग सुरू करण्यात आला. ललितकला शाखेचा विस्तार परिपूर्ण झाला. ललितकला विभाग सुरू झाल्यानं कोल्हापूरच्या आणि विद्यापीठ परिसरातील संगीत, नाटक, चित्रकला आदी फाईन आर्टस्‌ना एक नवं व्यासपीठ प्राप्त झालं. तसेच पश्चिम-दक्षिण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा मिळू लागला.

ज्या शिक्षणासाठी त्यांना पुणे, मुंबईसारख्या ठिकाणी जावं लागत होतं, तिथला खर्च त्यांना परवडत नव्हता. तेच शिक्षण आता त्यांना कोल्हापुरातच मिळू लागलं. साहजिकच, त्यांचा ओढा इकडेच वाढला. विविध ज्ञानशाखेत नावाजलेले गुरुजन असल्यानं त्यांच्या ज्ञानाचा लाभही त्यांना घेता आला. टी.व्ही., इंटरनेटसारखी अनेक साधणं त्यांच्या हाती आल्यानं त्यांच्या कला सादरीकरणासाठी व्यासपीठंही मिळू लागली.

अल्पावधीतच प्रसिद्धी मिळू लागल्यानं असंख्य विद्यार्थ्यांचं आयुष्यच बदलून गेलं. ललितकला विभाग सुरू करण्यासाठी मी प्रचंड कष्ट घेतले. रसिक जाणकारांना त्याची पुरेपूर जाणीव आहे. शिवाय, या ललितकला विभागाशी संबंधित अनेक कलाकार आजही माझ्याशी जोडले गेले आहेत. आजही ते मला भेटतात आणि आमच्यामध्ये नवीन प्रवाहाबाबत चर्चा रंगतात. ललितकला विभाग उभा राहिला. पूर्ण क्षमतेनं सुरू झाला. गेल्या ३०-३५ वर्षांत या विभागातून सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांनी पदविका प्राप्त केली, तर तीन हजार विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं. कलापुराला नवा आयाम प्राप्त झाला.

त्यानंतरही आजतागायत ललितकला विभागाच्या अनेक उपक्रमांत माझा सक्रिय सहभाग राहिला आहे. या विभागाच्या प्रमुख सौ. भारती वैशंपायन या दरवर्षी विभागातर्फे 'संगीत रजनी'चं आयोजन करीत. त्यासाठीही माझे सहाय्य असे. तसेच 'घराणा संमेलन', 'राजर्षी शाहू संगीत रजनी' अशा उपक्रमांत मी नेहमीच अग्रभागी राहिलो आहे. या विभागाला शासकीय अनुदान मिळावं, म्हणून मी सातत्यानं पाठपुरावा केला. कोल्हापूरची कीर्ती जगतात 'कलापूर' म्हणून व्हावी आणि 'ललितकले'ची तुतारी त्रिखंडात प्रतिध्वनीत व्हावी, या एकाच ध्यासापोटी मी हा अट्टाहास केला आणि घेतलेली जबाबदारी पेलून दाखवली.

'हार्मोनियम' या अभिजात वाद्याला मराठीमध्ये 'संवादिनी' हे पर्यायी विशेषण पु. ल. यांनीच दिलं आणि ते शास्त्रसंमतही झालं. या 'संवादिनी'वर जरी मला सूर आळवायची संधी मिळाली नसली, तरी मी 'संवादिनी'चा सूर मात्र हरवू दिला नाही. तो ललितकला विभागाच्या रूपानं कोल्हापुरात अखंड दरवळत राहिला आहे! आणि ज्या विधात्यानं माझ्याकडून हे करवून घेतलं, त्या विधात्याच्या चरणी ही 'ललित-सेवा' अर्पण करताना संत तुकारामांच्या शब्दांत मी एवढंच म्हणतो,

**गायनाचे रंगी। शक्ति अद्भुत अंगी॥**
**हे तो देणे तुमचे देवा। घ्यावी अखंडित सेवा॥**

sinhayan@pudhari.co.in

मनोरंजन

डॉ. आलोक जत्राटकर

**भारतातील झोपडपट्टीमधील दर्शन घडविणारा 'स्लमडॉग मिलेनिअर' 'ऑस्कर'मध्ये चालतो. मात्र, ब्रिटिश साम्राज्यवादाचे हिंसक स्वरूप दाखविणारा 'सरदार उधम' का चालत नाही? असा प्रश्न काहीजण उपस्थित करत आहेत. मुळात एखाद्या कलाकृतीकडे आपण व्यापक कलाव्यवहाराच्या दृष्टिकोनातून पाहत नाही, त्यातून काही प्रश्न आणि गुंते निर्माण होत असतात.**



# 'सरदार उधम'च्या निमित्ताने..!

'सरदार उधम' हा एक उत्तम निर्मितीमूल्य असलेला, भारतीय स्वातंत्र्य युद्धामधील एका दुर्लक्षित योद्ध्याच्या लढ्याचे प्रामाणिक दर्शन घडविणारा चित्रपट आहे... पण या प्रक्रियेदरम्यान तो ब्रिटिशांविरुद्ध द्वेषाची पेरणी करतो आणि आजच्या जागतिकीकरणाच्या युगात त्या द्वेषाला चिकटून राहणे योग्य नाही. 'ऑस्कर' पुरस्कारांसाठी भारतातून प्रवेशिका पाठविणाऱ्या पॅनेलमधील एक ज्युरी इंद्रदीप दासगुप्ता यांनी 'सरदार उधम' 'ऑस्कर'ला पाठविण्यासाठी अपात्र का ठरविण्यात आले, याचे स्पष्टीकरण देताना हे उद्‌गार काढले होते. सुमीत बासू या अन्य एका ज्युरी मेंबरने त्यावर चित्रपटाची लांबी प्रदीर्घ असल्याचे कारण दिले आणि त्यामुळे जालियनवाला बाग हत्याकांडाची वेदना प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यास वेळ लागतो, असेही आणखी एक कारण दिले. ज्युरी सदस्यांच्या या बादावर प्रतिक्रिया उमटल्या नसत्या तरच आश्चर्य. 'तुम्हाला बकाल, झोपडपट्टीतल्या भारताचे दर्शन घडविणारा 'स्लमडॉग मिलेनिअर' 'ऑस्कर'मध्ये चालतो. मात्र, ब्रिटिश साम्राज्यवादाचे हिंसक स्वरूप दाखविलेले का खुपावे?' अशा आशयाच्या या प्रतिक्रिया आहेत.

मुळात एखाद्या कलाकृतीकडे आपण व्यापक कलाव्यवहाराच्या दृष्टिकोनातून पाहत नाही, म्हणून मग त्यातून असले प्रश्न आणि गुंते निर्माण होतात. 'सरदार उधम' हा एका ऐतिहासिक सत्यघटनेवर आधारित बायोपिक आहे आणि तो एका चित्रपटविषयक आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पाठवीत असताना त्याचे निकष हे त्या क्षेत्राशी निगडित असावेत. महत्त्वाचे म्हणजे, दिग्दर्शकाने इथे एका क्लेषदायक, विदारक ऐतिहासिक घटनेचे दर्शन घडविले आहे. द्वेषभावनेपेक्षाही जे घडले, ते दाखविण्याचा आणि त्या घटनेचा एका युवकावर कोणता परिणाम झाला आणि अंतिमतः त्याची परिणती काय झाली, या प्रवासाची ती मांडणी आहे. जाऊ द्या ना त्याला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर. ठरवू द्या आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांना तो वास्तवाचे दर्शन घडवितो की द्वेषाचे! 'सरदार उधम'बद्दल ही भावना असेल, तर 'शिंडलर्स लिस्ट'बद्दल काय मत असेल या ज्युरीचे? अमेरिकेच्या जेम्स बाँडपटांना काय म्हणावे? अद्याप जे एलियन पाहण्यातही आलेले नाहीत, त्यांना पृथ्वीचे शत्रू ठरवून त्यांच्याविरुद्ध संघर्षाचे दर्शन घडविणाऱ्या तमाम हॉलीवूडपटांना काय म्हणायचे? गेल्या काही वर्षांत पाकिस्तानविरुद्ध भारतीय संघर्षाचे दर्शन घडविणाऱ्या चित्रपटांना आपण देशभक्तीच्या पारड्यात टाकतो. तेथे भारतीय उपखंडातील शेजारी देशाविरुद्ध द्वेषाची पेरणी केली जात नाही का? असेही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. ज्युरीच्या या एका प्रश्नाने कलामाध्यमाची आपली जाण किती संकुचित आहे, याचे दर्शन एकवार नव्याने घडले, इतकेच!

या पार्श्वभूमीवर, 'सरदार उधम' या चित्रपटाबद्दल मात्र बोलायला हवे. शुजित सरकार या अत्यंत प्रयोगशील दिग्दर्शकाने गेली २१ वर्षे उराशी बाळगलेले हे स्वप्न आहे. केवळ निर्मात्यांअभावी तो सामोरा येण्यास उशीर झाला, हे खरे! मात्र, वेळ चुकलेली नाही, हेही खरे! कारण, त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात हा चित्रपट आला असता, तर निर्मितीमूल्याच्या बाबतीत तो कदाचित इतका प्रभावी ठरला नसता. उधम सिंग यांचा प्रवास हा जागतिक कॅनव्हासवर खूप व्यापक आहे. भारतात तसेच भारताबाहेर रशिया, युरोप असा त्यांचा सुमारे २१ वर्षांचा हा अत्यंत नाट्यमय प्रवास आहे. हा सारा प्रवास अत्यंत प्रत्ययकारकतेने दिग्दर्शकाने मांडला आहे. हा केवळ एक सूडप्रवास आहे, असे म्हणणे हा उधम सिंगांवर आणि एकूणच भारतीय क्रांतिकारकांवर मोठा अन्याय ठरेल.

सुमारे शंभर वर्षांपूर्वी १३ एप्रिल, १९१९ रोजी जालियनवाला बाग हत्याकांड घडले. त्यावेळी ब्रिटिश सरकारने जुलमी रौलेट कायदा अंमलात आणून भारतीय जनतेला अक्षरशः ढोपरांवर रांगायला लावले होते. सभाबंदी, जमावबंदी, कोणत्याही कारणाशिवाय अटक अशा अनेक बाबींनी एतद्देशीयांवर जुलूम सुरू होते. नेत्यांची धरपकड सुरू होती. पंजाबातील नेते डॉ. सैफुद्दीन किचलू आणि डॉ. सत्य पाल यांच्या अटकेविरुद्ध शांततापूर्ण आंदोलन करण्यासाठी अमृतसरच्या जालियनवाला बाग मैदानात सुमारे वीस हजार नागरिक जमले होते. पंजाब प्रांताचा लेफ्टनंट गव्हर्नर सर मायकल ओ'ड्वायर यानं ब्रिगेडियर जनरल रेजिनाल्ड डायर याला 'स्थानिकांना अशी अद्दल घडवा की, पुन्हा मान वर उचलता कामा नये,' असे आदेशच दिलेले. असा हा डायर चहूबाजूंनी बंदिस्त आणि केवळ एकच प्रवेशद्वार असलेल्या जालियनवाला बागेत आपल्या पलटणीसह घुसला. प्रवेशद्वार रोखले आणि जमावाला कोणतीही पूर्वसूचना न देता, पांगण्याची संधी न देता थेट गोळीबाराचे आदेश दिले. शिपायांकडील गोळ्या संपेपर्यंत हा नृशंस हिंसाचार सुरूच राहिला. ब्रिटिश शिपायांचा गोळीबार, जमावाचा आक्रोश, मृत्यूचे थैमान आणि हे सर्व विचलित न होता, निर्दयीपणे पाहणारा जनरल डायर हेच चित्र जालियानवाला बागेत तेव्हा होते. या घटनेची चौकशी हंटर कमिशनने केली. काँग्रेसने स्वतंत्रपणे केली. वेगवेगळे आकडे सामोरे आले. ३७८ ते १,५०० मृत्यू आणि १,२०० हून अधिक जखमी. मैदानातल्या विहिरीतच १२० मृतदेह सापडलेले. हंटर कमिशनसमोर साक्ष देताना जनरल डायर म्हणतो कसा, मृतांचा आकडा २०० ते ३०० असल्याचे ऐकतो. माझ्या शिपायांनी तर १,६५० फैरी झाडल्या होत्या. असा त्याचा उद्दामपणा. हे प्रकरण दडपण्याचा इतका प्रयत्न त्या काळात झाला की, एप्रिलमध्ये घडलेल्या या हिंसाचाराची माहिती डिसेंबरपर्यंत ब्रिटनपर्यंत पोहोचली नव्हती. या घटनेच्या बाबतीत असाच उद्दामपणा ब्रिटिश सरकारने अगदी सन २०१९ पर्यंत दाखविला. याप्रकरणी त्यांनी अद्यापही भारत सरकारकडे अधिकृत माफी नोंदविलेली नाही, तर २०१९ मध्ये केवळ 'खेद' व्यक्त केला आहे.



या प्रसंगाचे अनेकांवर अनेक परिणाम झाले. रूड्यार्ड किपलिंग म्हणाला, डायरने आदेशाचे पालन करून केवळ त्याचे कर्तव्य बजावले. संवेदनशील मनाच्या रवींद्रनाथ टागोरांनी 'इतक्या निष्पाप लोकांची हत्या करणारे सरकार कोणाला कसलीही पदवी देण्याच्या पात्रतेचे नाही,' असे म्हणत ब्रिटिश सरकारची 'सर' ही पदवी परत केली. महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारविरोधात असहकार आंदोलनाची हाक दिली. तर या हत्याकांडाच्या झळा अगदी जवळून पाहिलेल्या, सोसलेल्या सरदार उधम सिंग यांच्यासारख्या युवकांची मने सूडभावनेने धगधगू लागली.

ही आग मनात धुमसत ठेवून उधम सिंग जनरल डायरला मारण्यासाठी म्हणून इंग्लंडला पोहोचतो. मात्र, त्याआधीच त्याचा मृत्यू झालेला असतो. मग, त्याला आदेशित करणाऱ्या गव्हर्नर ओ'ड्वायरचा तो माग काढतो. त्याची दैनंदिनी जाणून घेण्यासाठी त्याचा विश्वास संपादन करून त्याचा नोकर म्हणूनही काम करतो आणि एका क्षणी कॅक्स्टन हॉलमधील त्याच्या भाषणानंतर त्याचे नाव पुकारून त्याच्या छातीत गोळ्या झाडतो. त्याचा स्टेजवरील सहकारी लॉर्ड झेटलंड मात्र गोळीबारातून बचावतो. जालियनवाला बाग हत्याकांडाचा बदला घेण्यात २१ वर्षांनंतर उधम सिंग यशस्वी ठरतो. उधमला अटक केली जाते. अखेरपर्यंत तो गुन्हा कबूल करीत नाही. मात्र, त्याच्याविरुद्ध लुटुपुटुचा खटला चालवून फाशीची शिक्षा सुनावली जाते. आपला मित्र शहीद भगतसिंग याचे चित्र हाती घेऊन उधम सिंगही फासाला कवटाळतो.

शुजित सरकार यांनी उधम सिंगांबद्दल केलेले संशोधन फार महत्त्वाचे आहे. जागतिक धागेदोरे जोडत जोडत त्यांनी उधम सिंगांच्या चरित्राला पडद्यावर आकार दिला आहे. अविक मुखोपाध्याय यांची सिनेमॅटोग्राफी इतकी अप्रतिम की, हा चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहताना अधिक मजा आली असती. मात्र, त्याहूनही संकलनाच्या पातळीवर चंद्रशेखर प्रजापती यांची कामगिरी अधिक सरस आहे. उधम सिंगांच्या चरित्रापासून अनभिज्ञ असलेल्या दर्शकाला टप्प्याटप्प्याने त्याची माहिती करून देत हळुवारपणे त्याला माहिती असलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाच्या क्लायमॅक्सकडे ते घेऊन जातात. काही ठिकाणी काटछाट करून, विशेषतः जालियनवाला बाग हत्याकांडानंतर उधम सिंग लोकांना वाचविण्यासाठी जी धावपळ करतो, त्या प्रसंगांतही काही गोष्टी कमी करून चित्रपटाची लांबी आणखी किमान दहा-पंधरा मिनिटांनी सहज कमी करता येऊ शकली असती; पण त्याउलट विचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, या हत्याकांडाची तीव्रता, गांभीर्य प्रेक्षकांच्या मनावर खोल बिंबावे, यासाठी दिग्दर्शक-संकलक जोडीने हा प्रसंग मुद्दाम लांबवला असावा. उधम सिंगांच्या यातना अनुभवल्याखेरीज त्यांनी स्वीकारलेल्या मार्गाची यथायोग्यता लक्षात येणार नाही, हा त्यामागचा हेतू.

सरतेशेवटी विकी कौशलविषयी. इरफान खान पहिली पसंती असलेल्या उधम सिंगांच्या भूमिकेमध्ये विकीने अभिनयाची कमाल केली आहे. 'उरी'मध्ये 'हाऊज् द जोश?' असे उच्चरवाने विचारणाऱ्या अधिकाऱ्याच्या तुलनेत त्याने इथे केलेला अंडरप्ले खणखणीत आहे. शुजितच्या अपेक्षांचे सोने करत त्याने उधम सिंग साकारले आहेत.

अलीकडे आलेले चित्रपट जणू काही देशभक्तीचा, अस्मितेचा एक मोठा भावनिक डोस देऊन एक विशिष्ट ग्लानी, उन्माद पैदा करण्यासाठीच निर्माण केले आहेत, हे अक्षरशः जाणवते. 'सरदार उधम' मात्र देशभक्तीचा आक्रोश, कोलाहल मांडत नाही, तर आपल्या इतिहासातील एका काळ्या, दुखऱ्या घटनेची वस्तुनिष्ठ आठवण करून देतो आणि तसे करता करताच आपल्यातल्या हळव्या देशभक्ताला साद घालतो. त्यात द्वेषाचा लवलेश मात्रही नाही!